सकाळ



**गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटीतर्फे उपजिल्हा रुग्णालयात प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सी. जी. खोत यांना शुभेच्छा देताना डी. के. मायदेव, सुनीलदत्त जाधव, अशोक सुळकुडे, बाबासाहेब मार्तंड.**

# 'रवळनाथ'तर्फे डॉक्टरांना शुभेच्छा

**गडहिंग्लज :** येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे 'डॉक्टर्स डे'निमित्त डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सर्व शाखांच्या कार्यक्षेत्रात हा उपक्रम राबविण्यात आला. कोरोना महामारीच्या संकटाला न जुमानता रुग्णसेवा निष्ठेने करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यात आला. चंदगड शाखेच्या अध्यक्षा पुष्पा नेसरीकर, जयसिंगपूर शाखेचे सल्लागार प्रा. माणिक घुमाई, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखाधिकारी सुनीलदत्त जाधव, अशोक सुळकुडे, संभाजी हरेर, दीपक शिंदे, किरण कोडोली, पंकज कुंभार, किरण शहा, उत्तम दळवी, विक्रम जांभेकर, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड आणि सहकाऱ्यांनी संस्था कार्यक्षेत्रातील रुग्णालयात जाऊन डॉक्टरांची भेट घेतली. त्यांना पुष्पगुच्छ, शुभेच्छापत्र देऊन अविरत रुग्णसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक व शाखा सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/07/2022 Page No. 3